

## भिवंडीमध्ये घरपट्टी, पाणीपट्टी तीन महिन्यांसाठी केली माफ

भिवंडी : कोरोनामुळे भिवंडीतील नागरिक, व्यापारी, उद्योजक, यंत्रमागधारक यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याने त्यांना दिलासा देण्याकरिता लॉकडाऊनच्या तीन महिन्यांकरिता घरपट्टी, पाणीपट्टी माफ करण्याची घोषणा महापौर प्रतिभा पाटील यांनी बुधवारी ऑनलाइन महासभेत केली.

महासभेच्या विषयपत्रिकेत कोरोना व लॉक डाऊन काळातील तीन महिन्यांचे मालमत्ता कर व पाणीपट्टी माफ करण्याचा विषय प्रस्तावित होता. स्थायी सभापती हलीम अन्सारी यांनी चर्चेला सुरुवात करताना करमाफीची मागणी केली व त्यास सभागृह नेता विलास पाटील यांनी अनुमोदन दिले. महापौर म्हणाल्या की, कोरोनामुळे जाहीर केलेल्या लॉक डाऊनच्या काळात शहरातील व्यापारी, नागरिकांचे फार मोठे नुकसान झाले आहे. हे नुकसान भरून येणारे नाही. शहरातील नागरिकांना थोडासा आर्थिक दिलासा देण्याकरिता लॉकडाऊनच्या तीन महिन्यांच्या काळातील मालमत्ता व पाणीपट्टी कराची माफी देत आहोत. प्रशासनाने महासभेच्या या निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करावी, असे आदेश महापौरांनी दिले. शहरातील नागरिक, सेवाभावी संस्था, मोहल्ला क्लिनिक सुरू करणारे वैद्यकीय व्यावसायिक, महापालिका अधिकारी, कर्मचारी या सर्वांच्या सहकार्यामुळे कोरोनाची रुग्णसंख्या कमी होत असल्याबद्दल महापौरांनी समाधान व्यक्त केले व सर्वांचे आभार मानले.

# गणेशोत्सवातील कपड्यांच्या बाजाराचा बेरंग

## पडदे, झालरी, शोभेच्या छत्र्या, फेटे, कुडत्यांना मागणी नाही

मुंबईः मोठे मंडप वा घरगुती सजावटीच्या निमित्ताने मागणी असलेल्या गणेशोत्सवातील कपडा बाजारालाही यंदा करोना व टाळेबंदीमुळे आलेल्या निर्बंधाने व मंदीने घेतले आहे. ग्राहकांकडून मागणी नसल्याने घरगुती गणेशोत्सवाला लागणारे कापडी पडदे, झालर, शोभेच्या छत्र्या, गणपतीच्या शाली, तर सार्वजनिक मंडळांना लागणारे सजावटीचे कापड, मोठाले पडदे, कापडी झुंबर, फेटे, टोप्या अशा नाना वस्तू गोदामांमध्ये पडून आहेत, तर मोठय़ा गणेशमूर्ती यंदा नसल्याने सोवळ्याचे कापड विकणारे आणि नेसावणारेही यंदा मंदीच्या गर्तेत आहेत.

मंडपाचे कंत्राटदारही जिथे खरेदीसाठी येतात त्या लालबाग मार्केटमधले 'श्री राम ड्रेस'चे हेमंत पटेल सांगतात, ''यंदा मंडपच नसल्याने ना डेकोरेटर फिरकले ना मंडळवाले. अनेकांनी गेल्या वर्षीच्याच मालावर भागवले. घरगुती गणपतीसाठीही किरकोळच खरेदी होत आहे. त्यामुळे झालेले नुकसान लाखोंचे आहे.'' या बाजारपेठेतील प्रत्येक दुकानदाराचे हजारो मीटर कापड दरवर्षी विकले जाते. त्याशिवाय मंडळाच्या मागणीनुसार



अब्दगिरी, छत्री, टोप्या, फेटे, शेले यांचे मोठय़ा प्रमाणात उत्पादन घेतले जाते. यंदा मागणीच नसल्याने गतवर्षीचाच माल अद्याप पडून असल्याचे दुकानदार सांगतात.

गणेशमूर्तीच्या सोवळ्यासाठी लागणाऱ्या मलमल कापडासाठी हिंदमाता बाजारपेठ प्रसिद्ध आहे. मूर्तिकार, सोवळे नेसावणारे कलाकार यांची मोठी गर्दी इथे असते; परंतु यंदा केवळ १० टक्के कापड विकले गेल्याचे हिंदमाता येथील दुकानदारांनी सांगितले. ''दरवर्षी दहा ते बारा सोवळे नेसवणारे कलाकार जवळपास २० हजार मीटर कपडा घेऊन जातात. या वर्षी मोठय़ा मूर्ती नसल्याने थोडाच माल विकला गेला,'' अशी खंत 'श्रीनाथ फॅब्रिक'चे राजेश भगेश यांनी बोलून दाखवली.

या काळात एकसारखे कुडते किंवा टी-शर्टनाही मागणी असते. एखादाच वापरात येतील अशा लाखो कुडत्यांची निर्मिती धारावीत केली जाते; पण कारागीर आणि मागणीही नसल्याने तिथेही शुकशुकाट आहे. ''गणेशोत्सवाला महिना बाकी असतानाच आमची लगबग सुरू होते. मुंबईसह राज्यभरात आमचे कुडते जातात. ८० रुपयांपासून तर २०० रुपयांपर्यंतचे कुडते खास तयार केले जातात. प्रवासामुळे राज्यातून मागणी नाहीच. तसेच मुंबई-ठाण्यातील मंडळांमध्येही फारसा उत्साह नाही,'' असे धारावीतील कुडता व्यापारी प्रदीप श्रीवास्तव सांगतात. मस्जिद बंदरमध्ये घाऊक दरात टी-शर्ट निर्मिती आणि छपाई होते; पण यंदा तिथेही कुणी फिरकताना दिसत नाही. ''दरवर्षी शेकडो मंडळे आणि घरगुती गणपतीकरिता टी-शर्ट खरेदी करतात. जवळपास तीन महिने हे काम चालते. दहीहंडी, गणेशोत्सव मिळून चार ते पाच लाख टी-शर्ट विकले जातात; परंतु यंदा ही बाजारपेठ ठप्प आहे,'' अशी माहिती चकाला मार्ग येथील टी-शर्ट विक्रेत्याने नाव न छापण्याच्या अटीवरून दिली.

### सोवळे नेसवणारे कलाकारांसमोर पेच

गणपतींना सोवळे नेसवणारे हर्षद वारंग दरवर्षी चारशे ते पाचशे गणेशमूर्तींना सोवळे नेसवतात. त्यातील जवळपास २०० सार्वजनिक गणेशमूर्ती असून ३० मूर्तीचे सोवळे रोज बदलले जाते. एका गणपतीला किमान ३९ ते ४२ मीटर कापड लागते. आकर्षक काठ, नेसण्याच्या पद्धतीवर भाव ठरवला जातो. २ हजारांपासून ते ७ हजारांपर्यंत हा दर आहे.

## मूर्ती लहान, पण मंडप मोठे!

### आकार कमी करण्याच्या पालिका, पोलिसांच्या सूचना

मुंबई : करोनाच्या संकटामुळे या वर्षी सार्वजनिक गणेशमूर्ती चार फुटांपर्यंतच असावी असा नियम करण्यात आला असला तरी काही मंडळांनी आपले मंडप मात्र गेल्या वर्षीप्रमाणेच आकाराने मोठे उभारले आहेत. जागेवरील दावा कायम राहावा किंवा सामाजिक उपक्रम राबवता यावेत, यासाठी काही मंडळांनी मंडपाचा आकार मोठाच ठेवला आहे. मात्र, पोलीस आणि पालिका अधिकाऱ्यांनी याला आक्षेप घेऊन दोन दिवसांत मंडपाचा आकार कमी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या वर्षीच्या गणेशोत्सवावर करोनाचे सावट असून गणेशोत्सवासाठी राज्य सरकारने नियमावली जाहीर केली आहे. त्या चौकटीतच यंदा गणेशोत्सव साजरा करावा लागणार आहे. घरगुती मूर्ती २ फुटांपर्यंत, तर सार्वजनिक मूर्ती ४ फुटांपर्यंत असावी हा प्रमुख नियम आहे. तसेच मंडपात एका वेळी पाचपेक्षा जास्त कार्यकर्ते असू नयेत, आरती तसेच आगमन व विसर्जनाच्या वेळी १० पेक्षा जास्त कार्यकर्ते असू नयेत असे नियम करण्यात आले आहेत. या नियमांचे पालन करताना येत्या मंडळांचा कस लागणार आहे. तसेच मंडपांचा आकारही कमीत कमी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



मात्र मुंबईत काही ठिकाणी मंडळांनी दरवर्षीप्रमाणेच आपल्या मंडपाचा आकार ठेवला आहे. त्यामुळे यंदाही अनेक ठिकाणी रस्ता आक्र सला जाऊन मुंबईकरांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणार आहे. आता अशा ठिकाणी जाऊन पोलीस किंवा पालिकेचे अधिकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना समज देत आहेत. मंडपांचा आकार तत्काळ कमी करण्याच्या सूचनाही दिल्या जात आहेत. तसेच अनेक विभागांमध्ये पोलीस आणि विभाग अधिकाऱ्यांनी दृक्-श्राव्य माध्यमांद्वारे बैठक घेऊन मंडपाचा आकोर कमी करण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. ग्रँट रोड, ताडदेव परिसराचा भाग असलेल्या डी विभागाच्या हद्दीत तसेच वरळी, प्रभादेवीचा भाग असलेल्या जी दक्षिण विभागाच्या हद्दीत अशा तक्रोरी अधिक आहेत.

## संतत धार पावसात विजेच्या धक्क्याने चार शेळ्या जागीच ठार

ठाणेः विद्युत पुरवठा करणारी मुख्य वीज वाहक तारेचा शॉंक लागून बल्याणी ता. कल्याण येथील अनिता मांजे, या आदिवासी महिलेच्या चार शेळ्या जागीच ठार झाल्या. या घटनेचा पंचनामा टिटवाला पोलिसांनी केला असून या शेळ्यांचे शवविच्छेदन ही करण्यात आले आहे. या पुढील कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे.

महावितरणच्या कार्यालयाच्या ढिसाळ कारभारामुळे बल्याणी येथील कातकरी समाजाचे अनिता बबन मांजे यांच्या २५ शेळयांपैकी चार शेळ्या विजेचा धक्का लागून जागीच ठार झाल्याची दुर्देवी घटना मंगळवारी घडली आहे. या शेळ्या गावाशेजारील जंगलात चारण्यासाठी मंगळवारी सोडल्या होत्या. या शेळयांवर लक्ष ठेवायला अनिता



यांच्या बहिणीचा मुलगा सिताराम वाघे हा होता. दरम्यान या शेळ्या ऐका मागे एक जात आसतांना निकृष्ठ दर्जेच्या निकामी झालेल्या विजेच्या पोलवरील तुटलेल्या विद्युत वाहक तारच्या विजेचा शॉंक लागून या चार शेळ्या जागीच तडफडून मेल्या. संतत धार सुरु असलेल्या पावसा दरम्यान

> कल्याण तालुक्यातील बल्याणी - मोहिली दरम्यानच्या जंगलात मंगळवारी जोरदार पावसा दरम्यान पोजेच्या पोलवरील तार तुटली. वीज प्रवाह असलेल्या या तारे च्या वाजेचा धक्का लागून सहा वर्षांच्या दोन शेळ्या व सुमारे एक ते दीड वर्षाचे दोन बच्चे मेले. त्यांचे शवविच्छेदन केले असून अहवाल यायचा बाकी आहे. - डॉं. धनंजय मदाळे, पशुवैद्यकीय अधिकारी, कल्याण पंचायत समिती.

घडलेल्या या दुर्देवी घटनेतून सुदैवाने या शेळ्या चारणारा सीताराम बचावला आहे.

विजेच्या तारेला चिकटलेल्या या तडफडणार्या शेळ्या काढण्या चा प्रयत्न करणारा सीतारामही लांब फेकला गेला आणि सुदैवाने तो बचावला. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र या खरीब आदिवासी महिलेच्या शेळ्या मेल्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे. या वीज पुरवठा दुर्घटनेतील अक्षम्य निष्काळजी दुर्लक्ष करणार्या संबधित महावितरणच्या आधिकारी, कर्मचार्यांवर कारवाई करून गुन्हा दाखल करण्याची मागणी श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस राजेश चन्ने, विष्णू वाघे यांनी लावून धरली आहे. दरम्यान या जागीच ठार झालेल्या शेळयांचा पोलीस पंचनामा करण्यात आला. त्यानंतर पशू वैद्यकीय आधिकारी डॉ. धनंजय मदाळे यांनी जागेवर येऊन शेळयांचे पोस्टमार्टम केले, या पोस्टमार्टमचा अहवालाची प्रतिक्षा करण्यात येत आहे. त्यानंतर या मेलेल्या शेळयांच्या नुकसान भरपाईसाठी महावितरणच्या कार्यालयाकडे पाठपुरावा करावा लागणार असल्याचे राजेश चन्ने यांनी सांगितले.

## जन्मदात्या आईनेच दोन चिमुरड्यांना सुरी गरम करुन दिले चटके

### पोलिसांनी महिलेला घेतलं ताब्यात

मुंब्रा - जन्मदात्या आईनेच दोन चिमुरड्यांना चटके दिल्याची खळबळजनक मुंब्राजवळील दहिसर मोरी येथे घडली. ठाकुरपाडा परीसरातील स्टार चाळीत रहात असलेल्या फिरदोस या महिलेने तिच्या एक वर्षाची मुलगी आणि अडीच वर्षाच्या मुलाला सुरी गरम करुन त्यांच्या हातावर,पायावर आणि पाठणीवर चटके दिले.

ही बाब लक्षात येताच शेजारी राहणाऱ्यांनी महिलेला जाब विचारला असता तिने मेरे बच्चे है मै कुछ भी करुगी असे उद्धट उत्तर दिले. या घटनेची माहिती मिळताच शिळ-डायघर पोलिसांनी तिला ताब्यात घेतले असून,कायदेशीर कारवाई करण्याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती वरीष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी लोकमतला दिली. यापूर्वीही काही दिवसांपूर्वी ती मुलांना घरात कोंडून गेली होती. तीच्या या कृत्याला विरोध करणाऱ्याविरुद्ध ती रात्री अपरात्री दरवाजा ठोकत असल्याचा आरोप करते,अशी माहिती स्थानिक रहिवाशांनी दिली.

### प्रसिद्ध चित्रकार रामचंद्र कामत यांची आत्महत्या

## मुंबईतील घरात बाथटबमध्ये आढळला मृतदेह

### पोलिसांकडून अपघाती मृत्यूची नोंद

मुंबई : प्रसिद्ध चित्रकार रामचंद्र कामत यांचं निधन झालं आहे. मुंबईमधील माटुंगा येथील घरात बुधवारी ४१ वर्षीय रामचंद्र कामत यांचा मृतदेह आढळला. पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. पोलिसांना घटनास्थावरुन सुसाईड नोटही सापडली असून त्यामध्ये आत्महत्या करत असल्याचा उल्लेख आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास रामचंद्र उर्फ रामइंद्रनिल कामत माटुंग्यातील राहत्या घरी बाथटबमध्ये बेशुद्ध अवस्थेत आढळले. यानंतर औषधोपचार करण्यासाठी त्यांना सायन रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यावेळी



डॉक्टरांनी तपासणी करुन त्यांना मृत घोषित केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुसाईड नोटमध्ये आपल्या मृत्यूसाठी कोणीही जबाबदार नसल्याचं लिहिलं आहे. रामचंद्र कामत चित्रकारासोबत छायाचित्रकारदेखील होते. माटुंग्यात आपल्या आईसोबत ते राहत होते. पोलिसांनी सुसाईड नोटमध्ये कोणीही जबाबदार नसल्याचा उल्लेख असला तरी आत्महत्येचं कारण शोधण्यासाठी कुटुंबीय आणि मित्रांचा जबाब नोंदवला जाणार असल्याचं सांगितलं आहे.

## आरपीएफने विक्रमी वेळेत मोठ्या रेल्वे सामग्री चोरीचे प्रकरण पकडले

डोंबिवलीः मध्य रेल्वेच्या आरपीएफ इंटेलिजेंस विंग आणि कुर्ला आरपीएफच्या कर्मचाऱ्यांनी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. २५.६ लाख रुपये मूल्य असलेल्या ३४ मेट्रिक टन वजनाच्या ओएचई सामग्रीसह १७ व्यक्तींना अटक केली.

गुप्तचर विभागाच्या माहितीच्या आधारे इन्स्पेक्टर आरपीएफ, कुर्ला यांनी कुर्ला भागात छापा टाकला आणि १७ जणांकडून एक ट्रक, एक स्कूटी, १५ ऑक्सिजन सिलिंडर, ५ व्यावसायिक गॅस सिलिंडर आणि ९ गॅस कटर जप्त केले. एक ट्रक सामग्री आधीच उघडकीस आणण्यात आली आहे.

ट्रकचा शोध घेण्यासाठी टिम तयार करण्यात आल्या आणि त्यामध्ये हस्तक्षेप करून मुख्य आरोपीला अटक केल्यामुळे त्यांना १२ तासांच्या आत ताब्यात घेण्यात आले. कुर्ला येथे ओएचई स्थापित करण्यासाठी ओएचई सामग्री खरेदी केली गेली होती आणि कुर्ला येथील डिझेल शेडजवळ



ठेवली गेली होती.

श्री पी.आर. मीना, निरीक्षक कुर्ला, श्री एस.के. कोस्ता, निरीक्षक, दादर आणि पनवेल आरपीएफ इंटेलिजन्स विंगचे निरीक्षक श्री. अमित राघव यांनी श्री संजीव राणा, सहाय्यक सुरक्षा आयुक्त, दादर यांच्या मार्गदर्शनाखाली समर्पित प्रयत्नांनी हे प्रकरण उघडकीस आणले आहे.

**Universal Prime Aluminium Limited**

**CIN: L28129MH1971PLC015207**

**Registered Office: 1st Floor, Century Bhavan, 771, Dr A B Road, Worli, Mumbai - 400 030 Phone: 022-24304198**

**Email: upalbby@gmail.com**

**Public Notice – 48th Annual General Meeting**

This is to inform that in view of the outbreak of Covid-19 global pandemic, the 48th Annual General Meeting ("AGM") of Universal Prime Aluminium Limited ("the Company") will be held through video conferencing (VC)/ other audio visual means (OAVM) in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the rules made thereunder, read with Ministry of Corporate Affairs (MCA) vide Circular No. 14/2020 dated April 8, 2020, Circular No.17/2020 dated April 13, 2020 and Circular No. 20/2020 dated May 05, 2020 and Securities and Exchange Board of India (SEBI) vide its circular dated 12th May, 2020 (collectively referred to as Circulars) on Wednesday, 30th September, 2020 at 02:30 P.M. to transact the business as set out in the Notice of AGM which will be sent in due course of time.

The e-copy of the notice of the AGM along with the Annual Report for the FY 2019-20 of the Company will be available on the website of the Company at www.universalprime.in and on the website of CSDL at www.evoting.csdl.com. Additionally, the notice of AGM will also be available on the website of the BSE Limited at www.bseindia.com , in due course of time.

The Members can attend and participate in the AGM through VC/OAVM only, Detailed instructions for joining the AGM will be provided in the Notice of AGM. Accordingly, please note that no provision has been made to attend and participate in the AGM of the Company in person, to ensure compliance with the directives issued by the government authorities with respect to Covid-19 pandemic.

Members may further note that in pursuance of above stated circulars and in furtherance of Go-Green initiative of the government, the Notice of the AGM and Annual Report for the financial year 2019-20, will be sent through electronic mode only to those members whose email addresses are registered with the Company / Depository Participant. The members attending the meeting through VC or OAVM shall be counted for the purpose of quorum under section 103 of the Act. In case the email address is not registered with the Company / Depository Participant, please follow the process of registering the same as mentioned below:

| | |
|---|---|
| In case of Physical Holding | Members are requested to directly register their email id/ update their PAN by visiting the link of the Company's Registrar and Share Transfer Agent M/s. Maheshwari Datamatics Pvt Ltd as given below:<br>Link for email registration - http://mdpl.in/form/email-update<br>Link for PAN Updation - http://mdpl.in/form/pan-update<br>Send a duly signed request letter to the Registrar and Transfer Agent of the Company i.e. Maheshwari Datamatics Pvt. Ltd. (Unit: Universal Prime Aluminium Limited), 5th floor, 23, RN Mukherjee Rd, Esplanade, Lal Bazar, Kolkata, West Bengal 700001 or email at mdpldc@yahoo.com and provide the following details for registering email address:<br>a) Folio No.,<br>b) Name of shareholder,<br>c) Copy of the share certificate (front and back),<br>d) Copy of PAN card (self attested),<br>e) Copy of ADHAR (self attested) |
| In case of Demat Holding | Please contact your Depository Participant (DP) and register your email address in your demat account, as per the process advised by your DP. |

Members may also note that the Company will be availing e-voting services of Central Depository Services Limited (CDSL) to enable its Members to cast their vote on resolutions set forth in the Notice of the AGM.

Members may also note that if your e-mail id is registered with the Company/ Depository Participant, the login credentials for remote e-voting / e-voting during the AGM will be sent on the registered e-mail address along with the notice of AGM. However members who have not registered their email-id can follow the procedure for registering e-mail id as mentioned above. Members may note that the detailed procedure for remote e-voting / e-voting during the AGM is also mentioned in the notice of AGM.

The above information is being issued for the information and benefit of all the members of the Company and is in compliance with the MCA Circular(s) and the SEBI Circular.

**For Universal Prime Aluminium Ltd**
**Sd/-**
**(Priyanka Motwani)**
**Company Secretary**

**Place: Mumbai**
**Date: 20th August, 2020**

## व्यापाऱ्यांच झालं, जिम चालकांच पुनश्च : हरी ओम कधी होणार?

### शिष्टमंडळ मनसे आमदाराला भेटले

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महापालिकेने बाजारपेठेतील दुकाने,मार्केट सुरू करण्यास नियम व अटीं आखून व्यापाऱ्यांना परवानगी दिली. त्याच धर्तीवर जिम सुरू करण्यास देखील परवानगी द्यावी यासाठी डोंबिवली जिम ऑनर्स असोसिएशनने केली आहे.जिम ऑनर्स असोसिएशनने सदस्यांनी आज मनसे आमदार राजू पाटील यांची भेट घेतली.

कल्याण - डोंबिवली मध्ये सर्वाधिक जिम मालक हे मराठी आहेत. कोरोनाच्या संकटकाळात शासनाच्या नियमांचे पालन करत त्यांनी जवळपास आता 5 महिने जिम बंद ठेवल्या होत्या. मात्र आता कल्याण डोंबिवली मधील व्यापाऱ्यांची दुकान तसेच मार्केट सूरु झाली आहेत.त्यामुळे आता कल्याण डोंबिवली




मधील जिम देखील सुरू करा अश्या मागणीचे पत्र घेऊन पदाधिकाऱ्यांनी आमदारांची भेट घेतली आहे. कोरोनाच्या संकटकाळात सर्वच व्यवसायिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.त्यामध्ये जिम मालकांचा देखील समावेश आहे.त्यामुळे व्यापाऱ्यांना दिलेल्या दुकान सुरू करण्याच्या परवानगीच्या धर्तीवर जिम मालकांना देखील जिम सुरू करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी मनसेचे आमदार राजू पाटील यांच्या कडे केली आहे.शासन आणि महापालिका आखून देणाऱ्या नियम व अटींचे पालन करून आम्ही जिम सुरू करण्यास तयार असल्याचे जिम मालकांनी सांगितले आहे. कोरोनाच्या कालखंडात जिम मालकांचे देखील मासिक भाडे, वीजबिल थकलं आहे. त्याचप्रमाणे जिम मध्ये काम कामगार वर्ग सुद्धा मोठ्याप्रमाणात आहेत.त्यामुळे कल्याण डोंबिवली महापालिकेने जिम मालकांना देखील काही प्रमाणात सूट द्यावी अशी मागणी जिम मालकांनी केली आहे.

कल्याण डोंबिवली मध्ये ९०% जिम चालक हे मराठी आहेत.त्यामुळे त्यांच्यावर सध्या मोठा आर्थिक संकट आले आहे.त्यामुळे शासनाने व्यापाऱ्यांचे पुनश्च : हरी ओम केलं मात्र आता जिम चालकांच कधी करणार ? असा प्रश्न सध्या चालकांसमोर आहे.येत्या काही दिवसात जिम मालक आयुक्तांची भेट घेणार आहेत. त्यामुळे आता जिम चालकांच्या मागणीला केडीएमसी आयुक्त सकारात्मक प्रतिसाद देत मराठी उद्योजकांना न्यान देणार का हे पाहावे लागेल.